# सामाजिक बांधिलकीतुन कोतोलीतील आरोग्य सेवकांचा सत्कार




**प्राथमिक आरोग्य केंद्र , कोतोली येथील कोविड - १९ योद्धा वैद्यकिय अधिकारी डॉ. कुणाल चव्हाण यांचा सत्कार करताना संस्थापक - अध्यक्ष मा. डॉ.के.एस. चौगुले सोबत प्र. प्राचार्य डॉ. श्रीमती व्ही.पी.पाटील , संस्था सचिव मा. शिवाजी पाटील , जिमखाना विभाग प्रमुख श्री.यु.एन.लाड व इतर**

श्रीपतराव चौगुले आर्टस ॲण्ड सायन्स कॉलेज , माळवाडी - कोतोली , ता. पन्हाळा येथे ७४ वा स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहन ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक - अध्यक्ष मा. डॉ.के.एस. चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्राथमिक आरोग्य केंद , कोतोली येथील वैद्यकिय अधिकारी डॉ. कुणाल चव्हाण , आरोग्य सहाय्यक सौ. विजया जाधव , आरोग्य सेवक श्री. शैलेश गायकवाड , आरोग्य सहाय्यक सौ. मंगल पाटील , आरोग्य सेवक श्री. एम. आर. गराडे , आरोग्य सहाय्यक श्री . रघुनाथ पाटील , आरोग्य सेविका सौ. के.एस. आपटे या कोविड - १९ योध्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास संस्थेचे सचिव मा . शिवाजी पाटील , प्र. प्राचार्य डॉ. श्रीमती व्ही. पी. पाटील , प्राचार्य श्री. गजानन शिंदे , मुख्याध्यापिका सौ. टी. के. पाटील , मुख्याध्यापक श्री. जालिंदर आंगठेकर , डॉ. उषा पवार , श्री.यु. एन. लाड सर्व शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी स्वातंत्र दिना विषयी लेखांच्या भित्तीपत्रकाचे उद्घाटन संस्थापक - अध्यक्ष मा. डॉ. के .एस. चौगुले यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत श्री.पी .डी.माने यानी केले तर सुत्रसंचलन श्री .डी.एच.नाईक यानी केले.